प्रेस नोट दिनांकः—०२/०८/२०१९

फिर्यादी यांचा फुटपाथवर व्यवसाय करण्याकरीता दरमहा रु.१,०००/— हप्ता स्वरुपात लाचेची मागणी करुन ती लोकसेवकाने स्विकारल्याने मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २६/१९ |
| कलम | ७,१२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा—२०१८) |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १) अनिल शंकर म्हस्के वय—५४ वर्षे धंदा—नोकरी (कामगार, जी/नॉर्थ मनपा कार्यालय, दादर मुंबई)<br>२) महादेव अप्पा शिंदे वय—४७ वर्षे धंदा—नोकरी (कामगार, जी/नॉर्थ मनपा कार्यालय, दादर मुंबई) |
| पाहिजे आरोपी | कामगार, जी/नॉर्थ मनपा कार्यालय, दादर मुंबई) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये १,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १,०००/— |
| थोडक्यात हकीकत | यातील फिर्यादी हे दादर रेल्वे स्टेशनच्या बाहेरील फुटपाथवर भाजी विक्रीचा व्यवसाय करतात. फुटपाथवर व्यवसाय करण्याकरीता यातील लोकवेक क्रमांक ०१ व पाहिजे कामगार जी/नॉर्थ मनपा कार्यालय, दादर मुंबई यांनी फिर्यादी यांच्याकडे दर महा रुपये १,०००/— रकमेच्या हप्त्यांची मागणी केली होती.<br>फिर्यादी यांची लोकसेवकास हप्ता स्वरुपी लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष हजर राहून केलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याकामी पडताळणी दरम्यान लोकसेवक आरोपी क्र. ०१ व पाहिजे कामगार जी/नॉर्थ मनपा कार्यालय, दादर मुंबई यांनी फिर्यादीकडे रुपये १,०००/— रकमेच्या लाचेची मागणी केली. लाचेच्यावेळी लोकसेवक आरोपी.क्र.०२ यांनी प्रत्यक्ष घटनास्थळावर हजर राहून लोकसेवक क्र.०१ यास लाच देण्यास सांगून प्रोस्ताहन दिले. त्यावेळी लोकसेवक क्र.०१ यास रुपये १,०००/— रोख रकमेची लाच स्विकारताना रंगे हाथ पकडण्यात आले. आरोपी क्रमांक ०२ यास ताब्यात घेतले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकवेकाबद्दल तक्रार आल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.

संपर्कः— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग,वरळी,मुंबई—३०
संकेतस्थळः— **acbmaharashtra.gov.in**
ईमेलः— १) **acbwebmail@mahapolice.gov.in**
२) **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशनः—**www. acbmaharashtra.net**
टोल फ्रि क्रमांकः—१०६४
दुरध्वनी क्रमांकः—०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र.०२२—२४९२२६११
व्हॉट्स ॲप क्रः—९९३०९९७७००

2.8.19

सहाय्यक पोलीस आयुकत,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई